# दि.११-०५-२०२२ आयोजित रत्नागिरी जिल्हा निर्यात प्रचलन समिती बैठकीचे इतिवृत्त

रत्नागिरी जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दि.११-०५-२०२२ रोजी दुपारी १२.०० वा. मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीस उपस्थितांची सूची सोबत स्वतत्रपणे जोडली आहे.

महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,रत्नागिरी तथा सचिव,जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्षांचे अनुमतीने सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

देश पातळीवर District as Export Hub करिता केंद्र शासनाने ७५ जिल्ह्यांची निवड केलेली असून त्यामध्ये महाराष्ट्रातील रत्नागिरी, कोल्हापूर, नाशिक व पुणे इ.जिल्ह्याचा समावेश आहे. जिल्हा निर्यात कृती आराखड्याचे अनुषंगाने नमूद विविध मुद्यांच्या अनुषंगाने या समितीचे सदस्य संस्था कशा प्रकारे भूमिका निभावू शकतात याबाबतचा तपशिल यंत्रणांनी मांडावा जेणेकरुन त्यापैकी उचित मुद्दांचा जिल्हा निर्यात कृती आराखडयामध्ये समावेश करता येईल असे महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी यांनी सूचित केले.

तसेच रत्नागिरी जिल्ह्याने Prime minister Award योजने अंतर्गत ODOP या सदराखाली अर्ज केला असल्याबाबत विद्या कुलकर्णी, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी यांनी उपस्थित सदस्यांना अवगत केले.

Ernst & Young, LLP, Mumbai चे श्री. श्रीरंगन श्रीनिवासन यांनी तयार केलेल्या रत्नागिरी जिल्ह्याच्या निर्यातकृती आराखडयांचे Power point Presentation चे सादरीकरण केले. त्यावर मा. अध्यक्ष व सदस्यांनी सुचना व बदल सुचविले व पुढील बैठकीस सुधारीत निर्यातकृती आराखडा सादर करण्याबाबत सांगितले.

मुद्दा क्र. १ - एक्सपोर्ट प्रक्रियेमध्ये निर्यातदारांना प्रीशिपमेंट च्या क्रेडीटची आवश्यकता असते. तथापि त्यास बॅका नकार देतात. Collateral Security ची मागणी करतात परंतु निर्यातदाराकडे एवढया मोठ्या प्रमाणात Collateral Security उपलब्ध नसते त्यामुळे एक्सपोर्ट ची ऑर्डर पूर्ण करण्या इतपत खेळते भांडवल नसल्यामुळे ऑर्डर प्रमाणे निर्यात करता येत नाही असा मुद्दा श्री. ऋषीकेश पराजंपे, संचालक, मे. पराजंपे ॲग्रो प्रॉडक्ट,रत्नागिरी यांनी उपस्थित केला.

चर्चा :- सदर मुद्दयांच्या अनुषंगाने श्री. दाभोळे,उपसंचालक, DGFT यांनी सांगितले की, उद्योजकांचे जर Runing Account असेल तर बॅका खेळते भांडवल नाकारु शकत नाही असे अवगत केले. तसेच सदर बाबत निर्यातदारांना अडचण आल्यास DGFT,Pune कार्यालयास संपर्क करण्याबाबत सांगितले. तसेच Collateral Security ऐवजी CGTMSE योजने अंतर्गत निर्यातदारांना खेळते भांडवल बॅका देऊ शकतात असे सांगितले. तसेच CGTMSE अंतर्गत निर्यातदारांना खेळते भांडवलाची मर्यादा रुपये १कोटी ऐवजी रुपये २ कोटी करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.सदर मुद्याच्या अनुषंगाने सर्व बॅकर्सची सभा आयोजित करणेबाबत मा.अध्याक्षांनी सुचना केली.

मुद्दा क्र.२ - उत्पादीत वस्तू निर्यात करतांना निर्यातदारांस आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी फार मोठी रक्कम खर्च करावी लागते. सदर रक्कम खर्च केल्या नंतर शासना कडून १००% परतावा मिळावा अशी श्री. ऋषीकेश पराजंपे, संचालक, मे. पराजंपे अॅग्रो प्रॉडक्ट,रत्नागिरी यांनी केली.

चर्चा :- सदर मुद्दांच्या अनुषंगाने चर्चेदरम्यान विद्या कुलकर्णी,महाव्यवस्थापक यांनी सांगितले की, उद्योग विभागाकडून सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत उद्योजकता गुणवत्ता प्रमाणपत्राबाबतचा खर्चाचा परतावा दिला जातो असे सांगितले. तसेच APEDA चे श्री. प्रशांत वाघमारे यांनी त्यांच्या विभागाकडील योजनाची माहिती निर्यातदारांना दिली.

मुद्दा क्र.३- उत्पादित उत्पादच्या निर्यातीसाठी Airport व कोकण रेल्वेकडून Cold Storage ची सोय उपब्लध होण्या बाबत

चर्चा - सदर बैठकीत निर्यातदारांनी सांगितले की रत्नागिरी जिल्ह्यातील उत्पादने नाशवंत असलेने Airport ची गरज असल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने मा. अध्यक्षांनी सांगितले की विमानतळाचे काम प्रगतीपथावर असून एक्सपोर्ट अॅथोरिटी सोबत बैठक संपन्न झाली असल्याबाबत सांगितले. तसेच भुसंपादन विभागाने विमानतळासाठी जमिही अधिग्रहीत केली असल्याचे सांगितले. तसेच Cold Storage उभारणीसाठीच्या अनुषंगाने कोकण रेल्वेच्या अधिका-यांसोबत बैठक आयोजित करण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.

मुद्दा क्र. ४- काजू प्रक्रिया उद्योगांना उच्च कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. उच्च कुशल मनुष्यबळ निर्माण होण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यात प्रशिक्षण संस्थेची आवश्यकता असल्याबाबत श्री. परांजपे व श्री. जयवंत विचारे यांनी सांगितले.

चर्चा :- सदर मुद्दाच्या अनुषंगाने सदर उच्च कुशल मनुष्यबळ तयार होण्यासाठी Skill Development विभागाने आराखडयामध्ये सदर प्रशिक्षणाचा समावेश करण्याच्या सुचना मा. जिल्हाधिकारी यांनी संबंधीताना दिल्या. तसेच सौ.सुनंदा कु-हाडे अधिक्षक कृषी अधिकारी यांनी सांगितले की सदर प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या कच्चा माल कृषी विभागाकडून देण्यात येईल.

मुद्दा क्र.५ - निर्यातदार उद्योजकांना सर्व कार्यालयाकडील निर्यातीसंबंधीच्या योजना व माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी असा मुद्दा चर्चेदरम्यान उपस्थित करण्यात आला.

चर्चा :- प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी निर्यातीशी संबंधित सर्व केंद्र शासकीय व राज्य शासकीय अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात असलेल्या अल्प बचत सभागृह, रत्नागिरी येथे सर्व निर्यातदार व उत्पादक यांना मार्गदर्शन करण्यासाठी हजर राहून निर्यातदारांना विविध योजनांची माहिती द्यावी तसेच कृषी विभागाने निर्यातक्षम उत्पादकांचा whatsapp group बनवून त्यांना कृषी मेळाव्याद्वारे माहिती देवून मार्गदर्शन करावे तसे उद्दीष्ट संबंधित कृषी अधिकाऱ्यांना देणे तसेच निर्यातदारांचा whatsapp group MSMAB च्या समन्वयाने जिल्हा उद्योग केंद्र, यांनी तयार करावा व सदर निर्यातदारांना हा विषय अवगत करावा अशा सूचना मा. जिल्हाधिकारी यांनी दिल्या. सदर दिवशी यशस्वी निर्यातदारांना त्यांची यशोगाथा व निर्यात प्रक्रियेत आलेल्या अडचणी सांगण्यासाठी आमंत्रित कराव अशा सुचना दिल्या.

मुद्दा क्र. ६ - निर्यातदारांना आवश्यक अशा NABL Accredited Laboratory ची स्थापना रत्नागिरी येथे करण्यात येणार आहे. सदर बाबतच्या केंद्र शासनाच्या समुह विकास योजनेचा (MSE-CDP) अंतर्गत प्रस्ताव महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी कार्यालयाकडे सादर करण्यात आला असल्याबाबत सांगितले.

चर्चा :- सदर लॅबच्या माध्यमातून निर्यातीसाठी आवश्यक असणारे Parameters तपासले जातील. त्यामध्ये वेळेची व खर्चाची बचत होईल. Food, Chemical इ. सर्व प्रकारच्या Testing होऊ शकतील असे डॉ. स्मिता झोरे, Nutriment Research Foundation Ratngiri यांनी अवगत केले. सदर बाबत उपस्थित सर्व सदस्यांनी समाधान व्यक्त केले. त्यावर मा. जिल्हाधिकारी यांनी सदर प्राप्त प्रस्ताव केंद्र शासनाच्या समुह विकास योजनेचा (MSE-CDP) अंतर्गत उद्योग संचालनालयाकडे सादर करण्याबाबतची कार्यवाही करण्यासाठी सुचना दिल्या.

मुद्दा क्र.७- रत्नागिरी जिल्हाचा Export Data चा समावेश कृती आराखड्यात करणे बाबत

चर्चा :- जिल्ह्यातील Export Data मिळविण्यासाठी निर्यात उत्पादनाचा HS Code GST कार्यालय,रत्नागिरी यांना देऊन GST कार्यालयाकडून प्रत्येक महिन्यांचा अहवाल प्राप्त करुन घेवून सदरच्या माहितीचा समावेश Export Action Plan मध्ये निर्यातीचा Export Data हा संख्यात्मक स्वरुपात (Quantitative) करावा अशा सूचना मा. जिल्हाधिकारी श्री. श्रीरंगन श्रीनिवासन, **Ernst & Young,LLP,Mumbai** यांना दिल्या.

तसेच Enst & Young,LLP,Mumbai या संस्थेने Google Databasee/Sheet तयार करुन निर्यातीसाठी आवश्यक सर्व विभागांचा Database तयार करण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या.

वरील प्रमाणे कामकाज संपन्न झालेनंतर उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांचे परवानगीने सभा संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले .

**( विद्या कुलकर्णी )**
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र तथा सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती,रत्नागिरी

**(डॉ. बी.एन. पाटील)**
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, रत्नागिरी